# <u>शबरी</u>

श्रीराम आणि लक्ष्मण सीतेच्या शोधार्थ दक्षिण दिशेने आणखी पुढे गेले. आता ते पंपा सरोवराच्या परिसरात आले. तेथे जवळच मतंग ऋषींचा आश्रम होता. श्रीराम आणि लक्ष्मण मतंग ऋषींच्या आश्रमात गेले.

तो आश्रम रिकामाच होता. सारे आश्रमवासी आश्रम सोडून गेले होते. तिथे आता केवळ शबरी नावाची एक वृद्ध भिल्लीण होती. शबरीला मतंग ऋषींनी सांगितले होते की या आश्रमात श्रीराम येणार आहेत. त्यामुळे सारे जरी आश्रम सोडून गेले तरी शबरी एकटी रामाची वाट पाहत तिथे राहिली होती. श्रीराम येतील या <u>विश्वासाने</u> ती दररोज आश्रम साफ करी. रामासाठी अरण्यातून बोरे, फळे गोळा करून आणी. रामाला गोड आणि चांगलीच बोरे द्यायची म्हणून ती प्रत्येक बोर चाखून पाहत असे.


अशी रामाची वाट पाहत असताना एक दिवस श्रीराम आणि लक्षण खरंच आश्रमात आले. शबरीला अतिशय आनंद झाला. तिने त्या दोघांचे स्वागत केले. अरण्यातून आणलेली बोरे तिने राम-लक्ष्मणांना दिली. शबरीने <u>भक्तीने</u> दिलेली उष्टी बोरे रामाने <u>प्रेमाने</u> खाल्ली.

वृद्ध शबरीचा निरोप घेऊन श्रीराम आणि लक्ष्मण पुढे निघाले. ते ऋष्यमूक पर्वताच्या परिसरात आले. ऋष्यमूक पर्वतावर सुग्रीव नावाचा वानर राहत असे. त्याच्याबरोबर हनुमान आणि त्याचे इतर सोबती होते. ते सारे राम-लक्ष्मणांना भेटले. सुग्रीवाने रामाला त्याची कहाणी सांगितली.

सुग्रीवाचा मोठा भाऊ होता वाली. वाली हा किष्किंधा नगरीचा राजा होता. त्या दोघांचे एकमेकांवर अतिशय प्रेम होते. वाली महापराक्रमी होता. एकदा मायावी नावाच्या राक्षसाने वालीला आह्वान दिले. वालीने त्याचा पराभव केला. पण मायावी तेथून पळाला आणि पर्वतावर एका गुहेत जाऊन लपला. वाली आणि सुग्रीव त्याचा पाठलाग करत गुहेपाशी गेले. वालीने सुग्रीवाला गुहेच्या तोंडाशी थांबायला सांगितले आणि स्वतः आत गेला. तिथे खूप वेळ त्यांचे द्वंद्व झाले. शेवटी गुहेतून रक्ताचा ओहोळ बाहेर आला. सुग्रीवाला वाटले की वाली मेला. मायावी पुन्हा बाहेर येऊ नये म्हणून त्याने गुहेचे तोंड एका मोठ्या शिळेने बंद केले.

सुग्रीव किष्किंधेला परत गेला. तो किष्किंधेचा राजा झाला. परंतु काही काळानी वाली परतला. वालीला वाटले सुग्रीवाने कपटाने त्याला गुहेत कोंडले होते. त्याने <u>रागाने</u> सुग्रीवाला आपल्या राज्यातून हाकलून दिले. असा हा दुःखी सुग्रीव ऋष्यमूक पर्वतावर राहत होता.

सुग्रीवाने रामाला आपली कहाणी सांगितली. रामाने त्याला साहाय्य करण्याचे आश्वासन दिले. सुग्रीवानेही रामाला सीतेच्या शोधार्थ साहाय्य करायचे मान्य केले. अश्या रीतीने सुग्रीव आणि श्रीराम मित्र झाले.



1. शबरीने <u>भक्तीने</u> रामाला बोरे दिली.

   अश्या प्रकारे खालील शब्दांचा वापर करून वाक्ये तयार करा.

   प्रेम, आदर, राग, चिंता, आवड, विश्वास

2. शबरी कशी होती? तिच्याबद्दल दोन वाक्ये लिहा.

शिक्षकांसाठी:

1. खालील विषयांवर वर्गात चर्चा करणे:
   - विश्वास का महत्वाचा असतो? तुम्ही आतापर्यंत विश्वासाने कोणती गोष्ट केली आहे?